अ) **महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान** **[A] Maharashtra Sujal and NirmalAbhiyan**

| | | |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नाव | महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान (अस्तित्वातील नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण कार्यक्रमाचे रुपांतरण या अभियानाने करण्यात आले आहे) |
| 2 | योजना केव्हा पासून सुरु आहे | दि.22 ऑक्टोबर, 2008 |
| 3 | योजना / कार्यक्रमाचे उद्दिष्ट | महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त नागरी पाणीपुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापना संदर्भात पर्याप्त, गुणवत्तापूर्ण सेवा, किफायतशीर सेवाशुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उद्दिष्ट निर्धारित करुन महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान राबविण्याचा निर्णय दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. राज्यातील सर्व नागरिकांना पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या सर्वव्यापक सुविधा निश्चितपणे उपलब्ध करुन देणे हा महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे. |
| 4 | सुधारणा | • शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक 23.12.2008 अन्वये नागरी संस्थांना विविध सुधारणात्मक उपाययोजना स्विकारण्यासाठी व त्या पूर्ण करण्यासंबंधी राज्य शासनाशी करावयाच्या कराराचे प्रारुप विहीत करण्यात आले आहे.<br>• शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक 13.1.2010 अन्वये महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाच्या अंमलबजावणीकरीता तांत्रिक सहाय्य व समन्वयासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, फोर्ट मुंबई येथे सुधारणा व्यवस्थापन कक्ष (Change Management Unit) स्थापन करण्यात आले आहे.<br>• शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक 10.4.2012 अन्वये राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पायाभूत सुविधांतर्गत Service Level Benchmarks ची राज्यस्तरीय कक्ष निर्मिती व त्याची कार्यकक्षा विहीत करण्यात आली.<br>शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक 23.4.2012 अन्वये महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाच्या अंमलबजावणीकरीता तांत्रिक सहाय्य व समन्वयासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, फोर्ट मुंबई येथे स्थापन केलेल्या सुधारणा व्यवस्थापन कक्षाची (Change Management Unit) कार्यकक्षा (TOR) सुधारीत करण्यात आली.<br>• शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक 5.12.2012 अन्वये महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाच्या अंमलबजावणीकरीता तांत्रिक सहाय्य व समन्वयासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, फोर्ट, मुंबई येथे स्थापन केलेल्या CMU आणि SLB कक्षांतर्गत तज्ञ सल्लागारांच्या सेवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यात आला.<br>• शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक 23.1.2014 अन्वये महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानास सन 2014-15 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे व सुधारणा व्यवस्थापन कक्ष बंद करण्यात आला आहे. |
| 5 | निधी उपलब्धता / स्त्रोत | महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाअंतर्गत नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांसाठी खालील वित्तीय आकृतीबंधानुसार अनुदान देण्यात येते. (तक्ता खाली) |
| 6 | योजनेचे / कार्यक्रमाचे ठळक वैशिष्टय | • या अभियानाद्वारे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि यामध्ये तांत्रिक, आर्थिक व पर्यावरणात्मक शाश्वतता आणण्यासाठी राज्यातील नागरी संस्थांना तांत्रिक, व्यवस्थापकीय व वित्तीय सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे.<br>• या अंतर्गत नागरी संस्थानी करावयाच्या सुधारणाचा कालबध्द कार्यक्रम विहित करण्यात आलेला आहे.<br>• महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान अंतर्गत विहित सुधारणांची अंमलबजावणी सर्वसाधारण सभेचा ठराव व शासनाबरोबर करार करुन वचनबध्दता देणाऱ्या नागरी संस्थांना पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेसाठी वित्तीय आकृतीबंधानुसार वाढीव अनुदान देण्यात येते. |

| अ.क्र. | नागरी स्थानिक संस्था | अनुदान | कर्ज | नागरी संस्थांचा सहभाग |
|---|---|---|---|---|
| 1 | 20 लाखापेक्षा अधिक लोकसंख्येच्या महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) | 50 | 40 | 10 |
| 2 | उर्वरित महानगरपालिका | 70 | 20 | 10 |
| 3 | अ वर्ग नगरपालिका | 80 | 10 | 10 |
| 4 | ब आणि क वर्ग नगरपालिका | 90 | - | 10 |

| | | |
|---|---|---|
| | | • मोठया किंमतीच्या योजना मंजूर न करता कमी खर्चामध्ये अस्तित्वातील योजनेमध्ये सुधारणा करण्याचे धोरण आहे.<br>• अनेक शहरांना योजनेमध्ये सुधारणा करण्यासाठी कार्यक्रम मंजूर करण्यात आलेला आहे.<br>• प्रथमच शासनाने सुधारणांशी (ग्राहक सर्वेक्षण, पाणी लेखा परिक्षण, उर्जा लेखा परिक्षण, जी.आय.एस.मॅपिंग, हायड्रॉलिक मॉडेलिंग, फ्लो मीटर्स बसविणे, बिलींग व वसुलीचे संगणकीकरण) निगडित पाणी पुरवठा व मलनि:सारण कार्यक्रम सुरु केलेला आहे. यापूर्वी या अभियानांतर्गत सुधारणा तसेच भांडवली कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे. तथापि, शासनाच्या धोरणानुसार विविध सुधारणांची कामे प्रथम करण्याचे अपेक्षित असून या सुधारणांच्या आधारे अस्तित्त्वातील योजनेमध्ये आढळून येणाऱ्या त्रुटी लक्षात घेऊन तयार होणाऱ्या सविस्तर प्रकल्प अहवालाच्या (DPR) आधारे योजनेचे पुनर्वसन तसेच वाढवृध्दी करण्याचा प्रस्ताव विचारात घेण्यात येणार आहे. त्यानुसार सध्या पाणी पुरवठा योजनांमधील सुधारणा कामांना प्राथम्याने मंजूरी देण्यात येते. |
| 7 | योजना / कार्यक्रमाचे भौतिक / आर्थिक साध्य | महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत सन 2008-09 ते सन 2014-15 अखेर एकूण रु.1264.05 कोटी किंमतीच्या एकूण 258 योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. सदर योजनांसाठी एकूण रुपये 1092.35 कोटी ( ९० टक्के) अनुदान अनुज्ञेय असून दिनांक 01.04.2022 अखेर एकूण रु.933.74 कोटी इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. एकूण 258 मंजूर योजनेपैकी दिनांक 01.04.२०२2 अखेर 159 योजनांना अनुज्ञेय अनुदान पुर्णपणे वितरीत करण्यात आलेले आहे. उर्वरीत 99 योजनांना रुपये 158.61 कोटी इतके अनुदान वितरीत करणे शिल्लक आहे. सदर योजनेंतर्गत सन 20२1-२2 या आर्थिक वर्षासाठी रुपये 20.00 कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. |

या विभागाच्या दिनांक 23.1.2014 च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानास दिनांक 31.3.2015 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच निधीअभावी सदर अभियानांतर्गत कोणताही नवीन प्रस्ताव मंजूर करण्यात येणार नसल्याचा व पुढील कामे नगर विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या JNNURM, UIDSSMT किंवा नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच, नगर विकास विभागाच्या, दि.21.8.2014 च्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान" राबविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून राज्यातील लहान व मध्यम शहरात आवश्यक त्या पायाभुत सुविधांची निर्मिती करणे, उपलब्ध पायाभुत सुविधांची श्रेणीवाढ करणे व त्या अनुषंगाने नागरिकांना पायाभुत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट असून राज्यात अस्तित्वात असलेल्या सर्व नगर परिषदा, नगर पंचायती व ड वर्ग महानगरपालिकांचा समावेश सदर महाभियानामध्ये करण्यात आला आहे.